**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०३ / २०१२.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०७/०७/२०१२.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना.**
(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम २० व ३१ अ अन्वये स्थायी समितीच्या सदस्य पदी प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे सदस्यांच्या नियुक्तीसाठी )

**सभा क्रमांक ०३, दिनांक १६ - ०७ - २०१२.**

प्रति,

सन्मा.श्री. / श्रीमती.....................................................
सदस्य ,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय , यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम २० व ३१ अ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक १६-०७-२०१२ रोजी दुपारी १-०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या माळीवाडा येथील **"जुने महानगरपालिका सभागृहात"** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** विषय पत्रिका.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**सभा क्रमांक ०३**

सोमवार दिनांक १६-०७-२०१२ रोजी दुपारी १.०० वां होणा-या सर्वसाधारण  सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १५ | अहमदनगर महानगरपालिके मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०व ३१ अ अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन ८ (आठ) सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बाबत... |

मा.महापौर साो यांचे मान्यतेने.
दिनांक : ०७-०७-२०१२.

प्र.नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर.**

**सर्वसाधारण सभा क्रमांक - ०३**

सोमवार दिनांक १६/०७/२०१२ दुपारी १.०० वाजता

अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समिती सदस्यपदी प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाने आठ सदस्य नियुक्ती करणे

---*---

मा.स्थायी समितीचे रिक्त ८ (आठ) सदस्यपदी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २० व ३१ अ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणेकामी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आज सोमवार दिनांक १६/०७/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता जुने मनपा सभागृहात बोलाविण्यात आली सभेच्या अध्यक्षस्थानी पिठासिन अधिकारी म्हणुन मा.महापौर सौ.शिला अनिल शिंदे यांनी भुषविले.

**विषय क्रमांक :- १५**

**अहमदनगर महानगरपालिकेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० व ३१ (अ) ३ अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन आठ सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्त करणे.**

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीचे रिक्त आठ सदस्यपदी प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणेकामी गटनेत्यांनी नामनिर्देशित करावयाचे सदस्यांची यादी पिठासीन अधिकारी तथा मा.महापौर यांचेकडेस बंद पाकिटामध्ये सादर करणेबाबत उपस्थित सदस्यांपैकी सर्व पक्षाचे गटनेत्यांना सांगण्यात आले. त्याकरीता दुपारी १.१५ वाजलेपासुन दुपारी १.३० वाजेपर्यंत वेळ देण्यात आली.

मा.सदस्य श्री.बाळासाहेब बोराटे, मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.निखिल वारे यांनी सदस्य निवड पध्दत सभाकामकाजाची माहिती व संपुर्ण निवड प्रक्रीयेची नियमावली सभागृहास सांगणे बाबत मागणी केली. यावर सदस्य निवडी बाबतची माहिती प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांना पत्राव्दारे देण्यांत आलेली आहे. परंतु पुन्हा सांगण्याची गरज नसल्याबाबत मा.सदस्य श्री.दिलीप सातपुते यांनी सांगितले.

यावर मा.श्री.अंबादास पंधाडे, मा.श्री.बाळासाहेब पवार व मा.श्री.निखिल वारे या सदस्यांनी पक्षाच्या वतीने माहिती मिळाली नसल्याने पुन्हा एकदा माहिती सांगणे बाबत मागणी केली. यावर प्रभारी नगरसचिव यांनी मा.स्थायी समितीच्या रिक्त आठ सदस्यांच्या जागेकरीता नामनिर्देशनाव्दारे नियुक्त करावयाच्या पध्दती बाबत सभागृहास माहिती दिली. यानंतर बंद पाकिटात नामनिर्देशन दाखल करणे बाबतची वेळ (दुपारी १.३०) संपल्याने मा.श्री.बाबासाहेब वाकळे, श्रीमती.संगिता खरमाळे या सदस्यांनी गटनेत्यांनी दिलेली नावे सभागृहास वाचुन दाखविणे बाबत मागणी केली त्यानुसार पिठासीन अधिकारी तथा मा.महापौर यांनी खालील प्रमाणे सदस्यांची नावे वाचुन दाखविली व मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याचे जाहीर केले.

| अ.नं. | गटनेत्यांचे नांव | नामनिर्देशित सदस्यांचे नाव | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री.विनीत नाथ पाउलबुधे | मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे | राष्ट्रवादी कॉग्रेस |
| २ | | मा.श्री.शेख आरीफ शेख रफिउद्दीन | राष्ट्रवादी कॉग्रेस |
| ३ | मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे | मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे | भाजपा |
| ४ | | मा.सौ.संगीता रत्नाकर खरमाळे | भाजपा |
| ५ | मा.सौ.अनिता राजेंद्र राठोड | मा.श्री.अनिल वसंतराव बोरुडे | शिवसेना |
| ६ | | मा.श्री.उमेश खंडेराव कवडे | शिवसेना |
| ७ | मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले | मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले | मनसे |

व त्यानंतर आठवा सदस्य मा.स्थायी समितीच्या सदस्य पदी नामनिर्देशित करणेकरीता मा.सभेने निर्णय घ्यावयाचा असे जाहीर केले त्याप्रमाणे मा.सदस्य श्री.दिलीप नानाभाऊ सातपुते यांनी मा.सदस्य सौ.सुमनताई मोहिनीराज गंधे यांचे नांव सुचित केले त्यास मा.सदस्य श्री.नितीन शिवाजी शेलार यांनी अनुमोदन दिले. त्याप्रमाणे पिठासीन अधिकारी तथा मा.महापौर यांनी **मा.सदस्य सौ.सुमनताई मोहिनीराज गंधे** यांची मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याचे जाहीर केले

मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी नामनिर्देशनाव्दारे नियुक्त केलेले ८ (आठ) सदस्य पुढील प्रमाणे

| अ.नं. | मा.स्थायी समिती सदस्यांचे नांव |
|---|---|
| १ | मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे |
| २ | मा.श्री.शेख आरीफ शेख रफिउद्दीन |
| ३ | मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे |
| ४ | मा.सौ.संगीता रत्नाकर खरमाळे |
| ५ | मा.श्री.अनिल वसंतराव बोरुडे |
| ६ | मा.श्री.उमेश खंडेराव कवडे |
| ७ | मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले |
| ८ | मा.सौ.सुमनताई मोहिनीराज गंधे |

याप्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर पिठासीन अधिकारी तथा महापौर यांनी सभा कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सही/-

**( सौ.शिंदे शिला अनिल )**
**पिठासीन अधिकारी**
**तथा महापौर,**
**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**